!! श्री !!


शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते


जा.क्र. : खा.का.प्र.प ४०५ ०१/१२/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# खासदार चंद्रकांत खैरे यांच्या प्रयत्नांना यश

## केंद्रिय विद्यालयात प्रवेशाचा कोटा वाढवून मिळाल्याचे स्मृती इराणी यांचे पत्र

**नवी दिल्ली ( ता.०१ ) :** केंद्रिय कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी असलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेत स्थानिक गरीब विद्यार्थ्यांनाही शिक्षण घेता यावे यासाठी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी गेल्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत खासदारांना दिला जाणार प्रवेशाचा कोटा वाढविण्याची मागणी मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांच्याकडे केली होती, ती मागणी मान्य झाली असुन यंदाच्या शैक्षणिक वर्षापासुन केंद्रीय विद्यालयात खासदारांच्या शिफारशींचा प्रवेश कोटा सहा वरुन दहा करण्यात आला असल्याचे केंद्रिय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी एका पत्राव्दारे खासदार चंद्रकांत खैरे यांना कळविले आहे.

सातत्याने बदली होणाऱ्या केंद्रिय कर्मचाऱ्यांसाठी देशभरात ९७७ केंद्रिय विद्यालये व ५७६ जवाहर नवोदय विद्यालयाचे आहे. या शाळामध्ये मिळणारे शिक्षण दर्जेदार असल्याचे केंद्रिय कर्मचाऱ्यांव्यतीरिक्त सामान्य नागरिकांची प्रवेशासाठी रिघ लागते. खासदारांकडे निवडक कोटा असल्याने मतदार संघातील वंचित घटकांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळेत प्रवेश देऊ शकत नाही, त्यासाठी खासदारांचा कोटा दुप्पट करण्याची मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली होती. २०१३ च्या उन्हाळा अधिवेशनात खासदार चंद्रकांत खैरे यांनी संभाजीनगर एकच केंद्रिय विद्यालय आहे व त्यांच्या तुकड्या वाढविण्याची मागणी केली होती. त्यानुसार एक तुकडी गेल्यावर्षी वाढवून मिळाली आहे. महाराष्ट्रात नाशिक येथे ६, पुणे १४, मुंबई १३, नगर ३, जळगाव ३, तर संभाजीनगरात १ केंद्रिय विद्यालय आहे. केंद्रिय विद्यालयात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संख्या लक्षात शहरात या विद्यालयांच्या असुन किमान दोन शाखा असाव्यात व मनपाच्या शाळेंमध्ये त्या शाखा सुरु व्हाव्यात यासाठी खासदार चंद्रकांत खैरे यांनी पत्रव्यवहार केला असुन पाठपुरावा करीत असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या मागणीमुळे देशभरातील सर्वच खासदारांचा कोटा वाढल्याने हजारो स्थानिक विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतिचे सीबीएससी पॅटर्नचे शिक्षण मिळून देण्यासाठी मदत करता येणार असल्याचा आनंद असल्याचे ही त्यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525